**Scholarly Research Journal for Humanity Science & English Language,**
***Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2017: 5.068, www.srjis.com***
*PEER REVIEWED & REFERRED JOURNAL, APR-MAY, 2019, VOL- 7/33*

# साहित्य आणि पर्यावरण

**प्रा. आनंदा गांगुर्डे, Ph. D.**
*बारामती.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रास्ताविक :**

'आंतरविद्याशाखीय अभ्यास' हा विषय आज ज्ञानाच्या ऐरणीवर आला आहे. आज विज्ञान—तंत्रज्ञान, माहिती, संगणक व इंटरनेटच्या युगात देशा—देशांच्या सीमा पुसट होऊन जग फार जवळ आले आहे. परिणामी २१ व्या शतकात एका विषयाचे व एका शाखेचे ज्ञान त्रोटक वाटू लागले आहे. त्यामुळे विविध ज्ञानशाखांचे परस्पर संबंध शोधणे क्रमप्राप्त ठरणार आहे. जगाच्या अद्ययावत ज्ञानासाठी आपल्या मुख्य विषयासोबतच विज्ञान, मानव व नीती, सामाजिक शास्त्रे, वाणिज्य, कला व ललित कला, क्रीडा आदी विद्याशाखांचा अभ्यास असणे अत्यंत आवश्यक झाले आहे. ही गरज ओळखूनच आजच्या काळात 'इंटरडिसिप्लिनरी' अभ्यासाची महाराष्ट्रातल्या सर्वच विद्यापीठात चर्चा सुरु झाली आहे. 'साहित्याचा आंतरविद्याशाखीय अभ्यास' होणे आज क्रमप्राप्त आहे.

'साहित्याचा आंतरविद्याशाखीय अभ्यास' या अंतर्गत 'साहित्य आणि पर्यावरण' या दोन ज्ञानशाखांचा परस्परसंबंधांचा शोध घेऊन काही महत्वाची निरीक्षणे नोंदवावीशी वाटतात. नैसर्गिक पर्यावरण हा शब्दच आज मोठा परवलीचा झाला आहे. पर्यावरणाचा ऱ्हास झाल्यामुळे त्याचे दूरगामी दुष्परिणाम अखिल मानव जातीला भोगावे लागत आहेत. 'ग्लोबल वार्मींग', निसर्गाचा लहरीपणा, जलप्रदूषण, वायूप्रदूषण, निसर्गचक्रात झालेला बिघाड, पशू—पक्षांची घटणारी संख्या, बेसुमार वृक्षतोड यामुळे निसर्गसृष्टीतील पर्यावरणाचा असमतोल झाला. निसर्गनिर्मित परिस्थितीला नैसर्गिक पर्यावरण म्हणतात. उदा.प्रदेश, हवामान, ऋतुचक्र, पाणी, मृदा, वनस्पती, पशु—पक्षी, लता, वेली, फुलं—फळं, इ. घटक हे नैसर्गिक पर्यावरणाचे घटक आहेत. पर्यावरणाचे असे हे विविध घटक एकमेकांवर अवलंबून असतात. यालाच निसर्गचक्र असे म्हणतात. मानवाच्या आततायीपणामुळे या निसर्गचक्रात बिघाड झाला. परिणामी पर्यावरणाचा समतोल ढासळला. पर्यावरण संवर्धन काळाची गरज आहे. संपूर्ण जगात ५ जून हा दिवस 'जागतिक पर्यावरण दिन' म्हणून साजरा केला जातो. पर्यावरणाविषयी जाणीव—जागृती करण्याच्या दृष्टीने दरवर्षी हा दिवस साजरा केला जातो.

प्राचीन साहित्यापासून ते आधुनिक साहित्यापर्यंत मराठी साहित्यात पर्यावरणीय जाणिवा प्रगट झालेल्या आहेत. प्रसिध्द शास्त्रज्ञ प्रा. बर्नार्ड नोबेल यांच्या मते, ''पर्यावरणशास्त्र म्हणजे

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

विविध परिसंस्था प्रणालींच्या परस्पर संबंधांचे—संतुलन तत्वांचे शास्त्रीय अध्ययन होय. पर्यावरणातील नैसर्गिक व सांस्कृतिक घटकाचा मानवी जीवनावर जीवन पध्दतींवर होणाऱ्या प्रभावांचा पध्दतशीर व शास्त्रीय दृष्टिकोनातून केलेला अभ्यास म्हणजे पर्यावरणशास्त्र होय.'' मराठी साहित्यातील पर्यावरणीय संवेदन शोधत असताना अशा प्रकारे निसर्ग परिसंस्था म्हणजे हवा, पाणी, मृदा, प्राणी—पक्षी, खनिजे, वनस्पती, पाने, फुले, पर्वत, नदया, समुद्र, जलचर, भूकंप, त्सुनामी, अवर्षण, शेती, शेतकरी, ग्रामसंस्कृती इ. पर्यावरणातील घटकांचे साहित्यात पडणारे प्रतिबिंब शोधणे क्रमप्राप्त ठरणार आहे.

पर्यावरण म्हणजे सभोवतालचे वातावरण. वातावरणनिर्मिती हा साहित्यातील एक महत्वाचा घटक आहे. साहित्याचा विषय माणूस आहे आणि हाच माणूस निसर्गाचं अपत्य आहे. त्यामुळे कोणतेही साहित्य नैसर्गिक पर्यावरणापासून अलिप्त राहू शकत नाही. निसर्ग पर्यावरणाच्या खुणा साहित्यात पदोपदी जाणवतात. मानवी जीवन आणि त्याचा भवताल आजूबाजूच्या नैसर्गिक वातावरणाशी निगडीत असतो. साहित्यसृष्टी उभी करतांना लेखक निसर्गसृष्टीचे अनुकरण करतो. ॲरिस्टॉटलचा 'अनुकृती सिध्दांत हेच' सांगतो. त्याच्या मते 'कोणतेही काव्य हे निसर्गाची अनुकृती असते'. मानवी जीवनाच्या सर्व क्रिया—प्रतिक्रिया निसर्गाच्या अनुकरणातूनच अभिव्यक्त होत असतात. माणूस हे निसर्गाचं अपत्य असलं तरी साहित्य हे माणसाचं अपत्य आहे. त्यामुळे साहित्य आणि नैसर्गिक पर्यावरण यांचा अन्योन्य संबंध आहे. हा संबंध शोधून काढणे हाच प्रस्तुत शोधनिबंधाचा विषय आहे.

'मराठी साहित्यातील पर्यावरणीय संवेदन' हा मोठया संशोधनाचा विषय आहे या विषयाला 'प्राचीन साहित्यातील पर्यावरण, मध्ययुगीन साहित्यातील पर्यावरण, 'अर्वाचीन साहित्यातील पर्यावरण' 'आधुनिक साहित्यातील पर्यावरण' व 'लोकसाहित्यातील पर्यावरण' असे विविध पैलू आहेत. त्यातही पुन्हा ग्रामीण, दलित आदिवासी इ. वाङ्मयीन प्रवाहात आणि कथा कादंबरी, कविता, नाटक आणि ललित गद्यातही पर्यावरणाचे संदर्भ शोधता यतील. प्रस्तुत निबंधात साहित्यप्रकारांनुसार सखोल संशोधन शक्य असले तरी विस्तारभयास्तवढोबळ मानाने काही साहित्यकृतींमधील पर्यावरणीय जाणिवांचा शोध घेतलेला आहे.

१३ व्या शतकात संत ज्ञानेश्वरांनी मूळ भागवत गीतेवरील रसाळ गीताभाष्य 'ज्ञानेश्वरी' च्या रुपाने रेखाटले. आपली गीताटीका सर्वसामान्यांना समजावी म्हणून ज्ञानदेवांनी मूळ संस्कृत गीतेतील श्लोक स्पष्टीकरणासाठी मराठीतून दृष्टांत दिले. त्यांच्या या दृष्टांतात पर्यावरणीय जाणिवा पानोपानी विखुरलेल्या आहेत. अनुभवाची इंद्रियगोचर अनुभूती किंवा प्रचिती व्यक्त करताना संत ज्ञानेश्वर ज्ञानेश्वरींच्या १८ व्या अध्यायात म्हणतात,

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

''तरी शब्दु स्पर्शु । रुप, गंध रसु ।
हा पंचविध आभासु । ज्ञेयाचा जो ।।
जैसे एके चि चूतफळ। इंद्रियां वेगवेगळे ।
रसे वर्णे परिमळे । भेटिजे स्पर्शे ।।
तैसे ज्ञेय तरि एकसरे । परि ज्ञान इंद्रियव्दारें ।
घे म्हणौनी प्रकारे । पांचें जाले ।।''

आंब्याचे फळ एकच असते, परंतु या फळाचे ऐंद्रिय संवेदन इंद्रियानुरुप वेगवेगळे ठरते. डोळयांना त्याचे रंगरुप प्रतीत होते, जिभेला चव जाणवते, नाकाला गंध प्रतीत होतो; मूळ आंबा हा एकच असतो. तद्वतच शब्द म्हणजे ज्ञानविषय एकच असला तरी त्याचा इंद्रियगोचर अनुभव विविध प्रकारचा असतो. आंबा हे फळ निसर्गाचा उत्तम आविष्कार आहे. म्हणून ज्ञानदेवांचा आंब्याचा दृष्टांत पर्यावरणानुकुल आहे. 'ज्ञानेश्वरीचा' रसास्वाद कसा घ्यावा? हे सांगताना ज्ञानेश्वर म्हणतात,

जैसे शारदियेचे चंद्रकळे । माजी अमृतकण कोवळे ।
ते वेचिती मने मवाळे । चकोर तलगे ।।
तिया परी श्रोता । अनुभवावी हे कथा ।
अतिहळूवारपण । चित्ता आणोनीया ।।

शरद ऋतुतील शीतल चांदणे ज्या तन्मयतेने चकोर पक्षाची पिले सेवन करतात त्या तन्मयतेने श्रोत्यांनी ज्ञानेश्वरीचा रसास्वाद घ्यावा, असे सांगत असतांना ज्ञानदेवांनी शरद ऋतू, शीतल चांदणे, चकोर पक्षी या निसर्ग प्रतिमांचा यशस्वी वापर केला आहे. याशिवाय, 'पैल तो गे काऊ कोकताये', 'रुणूझुणू रुणुझुणू रे भ्रमरा', 'उड उड रे काऊ, तुझे सोन्याने मढविन पाऊ', 'जैसे भ्रमर परागू नेती । परी कमळदळे नेणती', 'परिमळांमध्ये कस्तुरी', 'पुष्पांमध्ये कमळ', अशा कितीतरी ठिकाणी निसर्ग प्रतिमांच्या आधारे संत ज्ञानेश्वरांनी गीतेतील तत्वज्ञान श्रोत्यांपर्यंत पोहोचविले आहे. संपूर्ण ज्ञानेश्वरीत पर्यावरणीय संवेदनांची मांदियाळी प्रगटली आहे.

ज्ञानदेवांप्रमाणे जगदगुरु श्री संत तुकाराम महाराजांनीही आपल्या अभंगगाथेत निसर्ग प्रतिमांची पखरण करुन पर्यावरण संवर्धनाचा मोलाचा संदेश दिला आहे.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

वृक्ष वल्ली आम्हां सोयरीं वनचरे । पक्षी ही सुस्वरे आळविती ।।
येणे सुखे रुचे एकांताचा वास । नाही गुण दोष अंगा येत ।।
आकाश मंडप पृथिवी आसन । रमे तेथे मन क्रीडा करी ।।
(अभंगगाथा क्र. २४८१)

देहू जवळील भंडारा व भामनाथ डोंगरावरील निसर्गसमृध्दी वर्णन करतांना पर्यावरण संतुलनाने अखिल मानवी जीवनास स्थैर्य प्राप्त होऊन या शांत व एकांत वातावरणात आमचे मन सृजनशील होते असे स्वानुभव कथन केले आहे. वृक्षाच्या विकासाच्या विविध अवस्था तुकाराम लक्षात घेतात. 'बीज' ही सुध्दा वृक्षाची व सृजनाची प्रारंभिक अवस्था ते मानतात. शुध्द बीज हे केव्हाही चांगले असे सांगताना ते म्हणतात, ''शुध्द बीजा पोटी । फळे रसाळ गोमटी ।।'' बीजात अंकुर सामावलेला असतो तद्वतच ब्रह्मात विश्व सामावलेले असते. तसेच बिजात तरुवर (वृक्ष) सामावलेला असतो, व तरुवरापासून पुन्हा बीजाची प्राप्ती होते. ''तरुवर बीजापोटी/बीज तरुवरा शेवटी । तैसे तुम्हा आम्हा जाले । एकी एक सामावले ।।'' भक्त देवामुळेच मान्यता पावतो, पण देवाला देवपण येते ते भक्तामुळेच. येथे देव—भक्ताचे मिलन सांगताना तुकाराम वारकरी संप्रदायाचे अद्वैत तत्वज्ञान मांडतात. अशा प्रकारे ''तुकाराम निसर्गाशी तद्रुप होतात. वृक्ष, फुले, फळे , पक्षी, प्राणी, पंचमहाभुते, आकाशातील ग्रह, उपग्रह, नक्षत्र अशी विविध प्रकारची निसर्ग प्रतिमाने त्यांच्या प्रतिभेने निसर्गाच्या व्यापक क्षेत्रातून टिपून घेतली असून आपला आशय ह्या नैसर्गिक पर्यावरणाद्वारे त्यांनी मोठया समर्पकपणे व स्वाभाविकपणे प्रगट केला आहे.''[२]

मराठी साहित्यात असणाऱ्या लोकसाहित्याला तर नैसर्गिक पर्यावरणाचे पारंपरिक अधिष्ठान आहे. मौखिक परंपरेतून प्रवाहीत असणाऱ्या लोककथा, लोकगीते, लोकसंगीत, लोकनृत्य, परंपरागत मिथकांतून, प्राणिकथांतून साधारणपणे निसर्गाचे पार्थिव स्वरुप, त्यातील प्राणिसृष्टी, वनस्पतिसृष्टी यासंबंधीचे संवेदन प्रगट झाले आहे. मराठी समाजाच्या नैसर्गिक परसिराचे एक शेजारधर्मीय भान काही लोकगीतांतून प्रकट झाले आहे. मराठी माणसाचे म्हणून असणारे घर कसे असते? या प्रश्नाचे एक सुंदर उत्तर डॉ. सरोजिनी बाबर यांनी 'निरशा दुधाची घागर' (१९७८) या पुस्तकात दिलेल्या एका लोकगीतातून मिळते.

''जन पुशीत्याती सांगा कुणाचे हे घर......?
— जाई मोगरा समूर,
सावळया सुरतीला न्हाई नटाया लागत
लाल केवडा बागेत,

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

थोरलं माजं घर पुढं लोटिता मागं केर
राघू मैना ग खेळकर,
केळी नारळी मोडुनी इटी दांडूला जागा केली
ल्योक अवकाळ जलामला.......!''

असे हे लोकगीत केवळ सुंदरच नाही तर विलक्षण अर्थपूर्णही आहे. या गीतात आलेले नैसर्गिक पर्यावरण वास्तवाचे नेमके भान घराच्या संदर्भात प्रकट करतात. पण; आज विज्ञानयुगात हे परंपरागत पर्यावरण हळूहळू नाहीसे होत असल्याचे संकेतही या गीताच्या शेवटी आहे. नव्याचे आगमन होतांना जुने उद्ध्वस्त केले जाते असा उद्वेगही येथे आहे. 'इटी दांडूला' जागा करतांना लेकाने गत वैभवाच्या केळी नारळी तोडून टाकल्या. असा हा ल्योक (मुलगा) अवकाळ म्हणजे विपरीत काळ जन्माला आला. सूचितार्थाने नैसर्गिक पर्यावरणाचे आता सांस्कृतिक पर्यावरणात रुपांतर होत आहे. ही जाणीव आधुनिक परिभाषेत 'ईकॉलॉजिकल' म्हणजे परिस्थितीकीय अशी जाणीव आहे. नैसर्गिक पर्यावरणाशी एक प्रकारचे जैविक नाते मराठी लोकसंस्कृतीने जोपासले आहे.

''आम्ही दोघी बहिणी
दोन गावांच्या बारवा
मध्ये चंदन हिरवा, भाईराजा !''

या जात्यावरील ओव्या रुपकात्म आहे; पण त्यामागील संवेदन पर्यावरणीय जैविक नात्याशी अतुटता दाखविणारे आहे. दोन बहिणी म्हणजे दोन बारवा आहेत, पण त्या दोन लांबच्या गावाला आहेत, तरी त्या दोघांनी एकत्र जोडणारा सेतू म्हणजे हिरवा चंदनरुपी असणारा त्यांचा लाडका भाऊ. या भावाला हिरवी श्रीमंती लाभते ती या दोन बारवातील पाण्यामुळे. असे यातील पर्यावरणीय संवेदन अपूर्व, विलक्षण आणि अर्थपूर्ण आहे. असे हे लोकसाहित्यातील नैसर्गिक पर्यावरण समृध्द आहे.

आपले बालकवी त्र्यंबक बापूजी ठोंबरे हे निसर्गकवी म्हणून सर्वज्ञात आहेत. आधुनिक कवितेच्या संदर्भात बालकवींना नैसर्गिक पर्यावरणाचे अग्रदूत मानावे लागते. त्यांच्या कवितेत निसर्ग प्रतिमांचे संमेलनच भरलेले आहे. त्यांच्याविषयी 'त्रिदल' च्या प्रस्तावनेत डॉ. दत्तात्रय पुंडे व डॉ. स्नेहल तावरे लिहितात की, ''निसर्गाबद्दलची एक कमालिची आसक्ती बालकवींच्या प्रतिभेला होती. निसर्गाच्या दिव्य, स्वर्गीय अशा सौंदर्याने त्यांच्या मनाला मोहिनी पडत असे, मग त्यांचे मन

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

निसर्गाशी मनसोक्त क्रीडा करु लागत आणि निसर्गाशी त्यांचे एक तादात्म्य निर्माण होत.''[३] बालकवींच्या निसर्गातील या तादात्म्यातूनच, 'तडाग असतो तर', 'श्रावणमास', 'फुलराणी', 'औदुंबर', 'तू तर चाफेकळी', 'निर्झरास', 'बालविहग', 'पाखरास', 'पारवा' इ. अजरामर कविता निर्माण झाल्या. या सर्व कवितांमध्ये नैसर्गिक पर्यावरणाचा आविष्कार अत्यंत तरल आहे. बालकवी म्हणजे निसर्ग व निसर्ग म्हणजेच बालकवी असे या दोघांचे अद्वैत आहे. पर्यावरणीय संवेदनात बालकवींचा क्रमांक फार वरचा आहे.

कविश्रेष्ठ कुसुमाग्रज 'मराठीपण' या कवितेत म्हणतात,
माझं मराठीपण मी शोधलं, सहयाद्रीच्या डोंगरात,

संतांच्या शब्दात
इतिहासाच्या पानात,
—तेव्हा सारीजणं हसून म्हणाली,
''आम्ही शोधलं आमचं मराठीपण
या भूमिवरच्या माणसांच्या मनात
त्यांच्या जखमांत, त्यांच्या रक्तात
ज्यांतून उसासतात सूर्याचे किरण,
मराठीपण ओलांडून
साऱ्या आकाशाला गवसणी घालणारे.....!''

विंदा करंदीकर म्हणतात,
हिरव्या पिवळया माळावरुन
हिरवी पिवळी शाल घ्यावी,
सहयाद्रीच्या कडयाकडून
छातीसाठी ढाल घ्यावी,
भरलेल्या भीमेकडून
तुकोबाची माळ घ्यावी

कुसुमाग्रज, विंदा करंदीकर यांच्यावरील कविता नैसर्गिक पर्यावरणाशी आमचे नाते जैविक गरजा भागविण्यासाठी असतात, असे सूचित करतात. गोविंदाग्रजांची 'प्रेम आणि मरण' माधव ज्युलियनांची, 'संगमोत्सुक डोह', कुसुमाग्रजांची 'पृथ्वीचे प्रेमगीत' या व यासारख्या कविता नैसर्गिक

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

पर्यावरणाचे वैशिष्टयपूर्ण संवेदन निर्माण करतात. बोरकर, पाडगावकर, खानोलकर, महानोर यासारख्या प्राधान्याने निसर्गकवी मानल्या गेलेल्या कवींचे निसर्गसंवेदनही व्यक्तीशः वैशिष्टयपूर्ण आहे.

**संदर्भ :**

*प्रा. बर्नार्ड नोबेल, 'पर्यावरण व समाज' — लेखिका, प्रा. शिल्पा कुलकर्णी,*
*डायमंड पब्लिशिंग, पुणे, प्रथमावृत्ती — ऑगस्ट २००८, पृष्ठ : २*
*डॉ.सौ. मालती पाटील, ''तुकारामांची प्रतिमासृष्टी व त्यांच्या काव्यात्मशक्तीचेमूल्यमापन'', नागपूर विद्यापीठ मुद्रणालय, नागपूर, १९७४, पृष्ठ : १९८.*
*डॉ. दत्तात्रय पुंडे व डॉ. स्नेहल तावरे, 'त्रिदल', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे,*
*आवृत्ती दुसरी : जानेवारी १९९४, पृष्ठ : पाच.*

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*